नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक - ४२२००१

NASHIKMETROPOLIS
नाशिक महानगर

# विकास परवानगी प्रमाणपत्र

( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६.६.१ नुसार )

जा.क्र : नामप्रविप्रा/रेखांकन/मौ.पिंपळगांव ब.,ता.निफाड/स.नं.४४२/१ब./ १३३ दि. २ / १ /२०१८

प्रति,
श्रीमती सुमनबाई बाबुराव विधाते,व इतर-१.
रा. पिंपळगांव बसवंत, ता. निफाड,
जि.नाशिक.

**विषय :** **मौजे पिंपळगांव बसवंत, ता. निफाड, जि.नाशिक** येथील **स. नं. ४४२/१ब** मधील क्षेत्र **२२००.० चौ.मी.** मधील क्षेत्रास **रहिवास** प्रयोजनार्थ **अंतिम अभिन्यास** मंजूरी बाबत.

**संदर्भ :** १) उपविभागीय अधिकारी, निफाड उपविभाग यांचे रहिवास कामी बिनशेती आदेश क्र. ११७/२०१७, दि.४.१०.२०१७.
२) आपला दि. ५.१२.२०१७ रोजी सादर अर्ज व प्रस्ताव.

मौजे पिंपळगांव बसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक येथील स.नं. ४४२/१ब मधील क्षेत्र २२००.० चौ.मी. क्षेत्रावरील रहिवास प्रयोजनार्थ अंतिम रेखांकन प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त रेखांकन प्रस्तावास विकास परवानगी देण्यात येत आहे.

(प्रतिभा भदाणे)
महानगर नियोजनकार,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

## परिशिष्ट ' अ ' (अंतिम रेखांकन परवानगी)

मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास करणे बंधनकारक राहील.

) प्रस्तावासोबत मोजणी मो.र.नं.४३९/१७, दि.२.११.२०१७ ने केलेल्या मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहीवाटीचे / हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद/न्यायालयीन वाद उद्‌भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/विकासक/जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी/वहिवाट, अर्जदार/विकासक/ जमिनमालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीद्वारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

३) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक / विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

४) मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन प्रमाणे भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्यांची रुंदी, १०% सुविधा भुखंड व १०% खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्या शिवाय कोणताही विकास करता येणार नाही.

तसेच मंजूर रेखांकनानुसार अंतर्गत रस्ते, सुविधा भूखंडातील क्षेत्र त्याचप्रमाणे मंजूर प्रादेशिक योजनेचे रस्ते /रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र जागा मालकास/विकासकास वाढीव चटईक्षेत्राच्या बदलात संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे झाल्यास अशा अनुषंगिक क्षेत्राची मोजणी जागा मालकाने /विकसकाने संबंधित भूमी अभिलेख विभागाकडे रितसर अर्ज करुन घेणे बंधनकारक राहील. तद्नंतर अशा क्षेत्राखालील जमिनीचे खरेदीखत संबंधित नियोजन प्राधिकरणाचे नावाने जागा मालकाने/विकसकाने स्वखर्चाने करुन देऊन तसा ७/१२ उतारा व त्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेचा ताबा दिल्यानंतरच अशा क्षेत्राचा वाढीव चटईक्षेत्र मिळणेबाबत आवश्यक त्या बांधकाम नकाशा व अनुषंगिक कागदपत्रासह अर्ज करण्यास अर्जदार पात्र राहतील.

५) मंजूर नकाशामध्ये **मौ. पिंपळगांव बसवंत, ता. निफाड येथील स.नं.४४२/१ब मधील क्षेत्र २२००.० चौ.मी.** या एकत्रित क्षेत्रावर मंजुरी आहे. उक्त सदर ग.नं.४४२/१ब मधील क्षेत्रामध्ये आवश्यकता असल्यास एकत्रिकरणाबाबतची सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन त्यानुसार आवश्यक ती नोंद महसुल दप्तरी होऊन तसा नोंदी बाबतचा प्रॉपर्टी कार्ड उतारा / ७/१२ उतारा व मोजणी नकाशा सादर करणे अर्जदार / विकासक / जमिन मालक यांच्यावर बंधनकारक आहे.

६) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त **रहिवास** या प्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील.

७) अभिन्यासातील रस्ते व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले वर्गीकृत / प्रादेशिक योजना रस्ते/रस्ता रूंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीन मालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.

८) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांने/विकासकांने/ जमीन मालकाने भुखंड/सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधान कारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

९) सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते/रस्ता रुंदी क्षेत्र नकाशावर दर्शविलेनुसार प्रत्यक्ष जागेवर असणे आवश्यक आहे.

१०) अभिन्यासातील प्रस्तावित खुली जागा ही अभिन्यासातील सर्व भूखंड धारक/इमारतीतील रहिवाशी यांच्या सामाईक वापरासाठी राहील.

११) अभिन्यासातील कोणत्याही भूखंडाची उपविभागणी पूर्व परवानगी शिवाय करण्यात येऊ नये.

१२) बांधकाम करतांना अभिन्यासातील प्रत्येक भूखंडात बांधकामासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार या प्राधिकरणाची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे.

१३) विकास नियंत्रण नियमावलीनुसार तरतुद क्र. ६.८ नुसार अभिन्यासाअंतर्गतची करावयाची विकास कामे जसे रस्ते, गटारी, पाणी पुरवठा व्यवस्था, विद्युत दिवे व्यवस्था, खुल्या जागेचा विकास करणे विकसकास बंधनकारक राहतील. त्याअनुषंगाने टप्प्या टप्प्याने बांधकाम परवानगी अनुज्ञेय होईल.

१४) सदर जागेस पोच रस्त्याबाबत भविष्यात वाद उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

१५) सदर रेखांकनाखालील जागा नदी लगत असल्यास पाटबंधारे विभागाकडील नकाशानुसार निषेधक पूररेषेच्या (Blueline)आत कोणतेही बांधकाम करता येणार नाही. तसेच निषेधक पूररेषा (Blueline) व नियंत्रक पूररेषा (Redline) यामधील क्षेत्रामध्ये मंजूर बांधकाम नकाशानुसार बांधकाम करणेत यावे. मात्र, पूररेषेलगतचा हरितपट्टा कायमपणे खुला ठेवून वृक्षारोपणाद्वारे विकसित करणे आवश्यक आहे.

१६) जागेतील/जागेलगतच्या नाल्याच्या/नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता येणार नाहीत. सदर अटीचा भंग करून विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार / विकासक / जमिनमालक यांची राहील.

१७) **सुविधा भुखंडातील प्रस्तावित इमारतीचा वापर सार्वजनिक वापरासाठीच करणेचा आहे.**

१८) स्ट्रक्चरल इंजिनिअर/डिझायनर यांनी तयार केलेल्या Structural Design नुसार प्रत्यक्ष जागेवर विकास करणेची जबाबदारी विकसक व सुपरवायझर यांची संयुक्तिक राहील.

१९) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणेअर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील. **(नियम क्र. ७.१)**

२०) अभिन्यासातील नियोजन केलेल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याची व त्यांची जोपासना करणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

२१) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडील अधिसूचना क्र. S.o.३९९९(E) दि. ०९/१२/२०१६ मधील Appendix-XIV मधील पर्यावरणाच्या अटींची पुर्तता करणे अर्जदार/विकसक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील व सदर अटी बंधनकारक असल्याबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२२) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२३) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तूतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावासोबतच्या रेखांकन नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्तावासोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.

**महानगर नियोजनकार,**
**नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**नाशिक**

E:\NMRDA order\Layout letter.docx

वाचले :- १.महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२-क, ४४.

२.महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी)नियम १९६९.

३.मा.जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडील आदेश क्र.मशा/कक्ष/३/९/कावि/८६/२०१६ दि.२/२/२०१६.

४.श्रीमती सुमनबाई बाबुराव विधाते व इतर ०१ रा.पिंपळगाव (ब.)ता.निफाड जि.नाशिक यांचा दि.२२/५/२०१७, १२/९/२०१७ रोजीचा बिनशेती परवानगी अर्ज.

५.ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव ब. ता.निफाड याचे दि.७/७/२०१७ रोजीचा दाखला.

६.मा.जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक(भुसं.शाखा)यांचे क्र.भुसं/कक्ष-१०/३/कावि/३७२/२०१७ दि.११/७/२०१७ रोजीचा दाखला.

७.म.सहा.संचा.नगररचना नाशिक यांचेकडील क्र.बिशेप/अभि./मौजे पिंपळगाव ब.ता.निफाड/ ग.नं.४४२/१ब/पै. ससना/१८३१ दि.११/७/२०१७.

८.मंडळ अधिकारी पिंपळगाव ब.ता.निफाड यांचा क्र.२६०/२०१७दि.११/७/२०१७रोजीचे स्थळनिरीक्षण अहवाल.

९.श्रीमती सुमनबाई बाबुराव विधाते व इतर ०१ रा.पिंपळगाव (ब.) ता.निफाड जि.नाशिक यांचे दि.११/७/२०१७ रोजीचा करारनामा व दि.२२/९/२०१७ रोजीचे बंधपत्र.

---

उपविभागीय अधिकारी निफाड
भाग निफाड यांचे कार्यालय
क्रं.जमा/एनए/एसआर/**११७/२०१७**
निफाड दि. ०४ /१०/२०१७

**आदेश :-**

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम- १९६६ चे कलम-४२-क, ४४ प्रमाणे व त्याखालील नियमान्वये श्रीमती सुमनबाई बाबुराव विधाते व इतर ०१रा.पिंपळगाव(ब.)ता.निफाड जि.नाशिक यांना **मौजे पिंपळगाव ब. ता.निफाड** येथीलग.नं./स.नं.**४४२/१ब पैकी** क्षेत्र-**२२००चौ.मी.यात** भुखंड क्र.**०१** + भुखंड क्र.२(ॲमिनीटी ) **यांस निवासी** प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम आणि त्याखालील नियम व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (सुधारणा ) अध्यादेश १९९४,महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी)नियम १९६९. व त्याखालील नियमांना अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

२. परवानादार यांनी आदेशातील प्लॉट व प्लॉटचे विभाजन माझे पुर्व संमतीशिवाय करु नये.

३. परवानादार यांनी सदरहू जमीन व त्यावरील बिल्डींग वा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे. त्याच कारणासाठी करावा, तसेच सदरहू जमिनीचा किंवा जमिनीपैकी काही भागाचा वा त्यावरील बिल्डींगचा वा बांधकामाचा उपयोग दुस-या कारणासाठी करावयाचा झाल्यास त्यास या कार्यालयाची लेखी पुर्व संमती घ्यावी तसेच त्याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपुर्ण जमिनीचा उपयोग म्हणून मानण्यात येईल.

४. परवानादार यांनी हा आदेश दिलेल्या तारखेपासून एक वर्षाचे आंत जमिनीची सुधारणा, मजूर ले-आऊटप्रमाणे म्हणजे रस्ते,ड्रेनेज इ.करावी की, ज्यामुळे माझी व संबंधीत ग्रामपंचायतीची संमती राहील त्याचप्रमाणे सदरहू ले-आऊटमधिल प्लॉटची मोजणी व रेखांकन सर्व्हे खात्याकडून करुन घ्यावा व जों पर्यंत जमिनीची सुधारणा होत नाही तोपर्यंत त्यामधिल प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावू नये.

५. परवानादार यांनी सदरहू जमिनीतील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावली तर परवानदार यांची जबाबदारी राहील की,सदरहू प्लॉटची विक्री वा विल्हेवाट आदेशातील/सनदेतील अटी शर्तीस अधिन राहून करावी.

६. सदरहू परवानगी ही म.सहा.संचालक, नगररचना, नासिक यांचेकडील उक्त निर्दिष्ट <u>**पत्र क्र.१८३१ दि.११/७/२०१७ प्रमाणे व**</u> त्यामधिल अटी व शर्तीस अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे. (सोबत झेरॉक्स प्रत) त्याचबरोबर मजूर अभिन्यासातील देखाव्याच्या नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा,ओटयावर बांधावयाचे बांधकाम वा प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधावयाची बिल्डींग या त्याप्रमाणे प्रत्यक्षात करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (सोबत-मंजूर अभिन्यास प्रत)

७ प्रश्नाधिन क्षेत्रात प्रत्यक्ष इमारतीचे बांधकामापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक राहील.

८. परवानगीदार यांनी बिल्डींग प्लॅन हे संबंधीत सक्षम अधिका-याकडून मंजूर करुन घ्यावेत. ज्या ठिकाणी सक्षम अधिकारी नाही. अशा वेळी परवानगीदार यांनी महाराष्ट्र जमिनी महसुल (जमिनीच्या वापरात बदल-अकृषिक आकारणी)नियम-१९६९ अनुसूची ३ प्रमाणे प्लॅन तयार करुन घेऊन तो या कार्यालयाकडून मंजूर करुन घेऊन त्याप्रमाणे बांधकाम करावे.

९. परवानादार यांनी राष्ट्रीय महामार्ग जिल्हामार्ग यामधिल रस्त्यांची सिमा व इमारतीची रांग यामधिल व इमारतीची रांग या नियंत्रणरेषामधिल

परवानादार याना जामनाचा अकृषिक कारणासाठी [illegible] भरुन घेऊन वाढवून देण्यात येईल. सदरहू कालावधी या कार्यालयाचे आदेशाप्रमाणे परवानेदार यांचेकडून दंड व नजराणा रक्कम भरुन घेऊन वाढवून देण्यात येईल.

परवानदार यांनी बिल्डींग व इतर बांधकामे पुर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढ व बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदल पुर्व परवानगी-शिवाय व सदरहू बांधकामांचे प्लॅन सहा.संचालक,नगररचना/ग्रामपंचायत/या कार्यालयाकडून मंजूर करुन घेतल्याशिवाय करु नये.

परवानदार यांनी म.ज.म.(जमिन वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम-१९६९ चे अनुसूची-४ वा ५ मध्ये नमूद केलेल्या शर्ती व नमून्यामध्ये सनद बिनशेती उपयोग सुरु केल्यापासून एक महिन्याचे आंत करुन देणे बंधनकारक राहील.

परवानदार यांचेकडून या आदेशातील / सनदेतील अटी व शर्तीचा भग केल्यास म.ज.म.अधिनियम- १९६६ व त्याखालील नियमान्वये महसुल अधिकारी जो दंड व सारा फर्मावतील त्याप्रमाणे दंड व सारा भरुन घेऊन नियमत करुन घेता येईल.तसेच विविध अटी व शर्ती नमूद केल्या असल्यातरी सुध्दा महसुल अधिकारी यांना या परवानगीचे विरुध्द बिल्डींग व इतर बांधकामे केली असल्यास वा ते वाढवून वा त्यामध्ये बदल केला असल्यास ते ठराविक मुदतीत काढून टाकण्यास फर्मावण्याचा अधिकार राहील व सदर मुदतीत परवानदार यांनी तसे न केल्यास स्वत: महसुल अधिकारी ते सदरहू बांधकाम काढून टाकतील व ते काढून टाकण्याचा खर्च परवानदार यांचेकडून जमिन महसुलाची बाकी म्हणून वसुल करतील.

२०. सदरहू परवानगी ही इतर कायद्यामधिल तरतूदीस अधिन राहून व सदरहू प्रकरणी त्या कायद्याच्या लागू असलेल्या तरतुदीस अधिन राहून म्हणजे मुंबई कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम-१९४८,नागरी कमाल जमिन मर्यादा कायदा १९७६ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व नगरपालिका अधिनियम इ. तरतुदीस अधिन राहून देण्यात येत आहे.

२१. परवानाधारक यांनी जमिनीचा अकृषीक सारा दर चौ.मीला दर रु.००.१० पैसे याप्रमाणे ज्या अकृषीक कारणासाठी दिला आहे त्याच कारणासाठी आणल्याच्या तारखेपासून भरावा.अकृषीक सारा दर हा दि.०१/०८/२००८ पासून सुधारीत अकृषीक दराने येणा-या फरकाची रक्कम भरण्याचे अटीवर सदरची परवानगी देण्यात येत आहे.तसेच भविष्यात कोणत्याही प्रकारचे शासकिय येणे/नजराणा आढळल्यास ते भरणे परवानाधार क यांचेवर बंधनकारक राहील.

२२. **अधिकारी अभिलेख व जमिनीच्या मालकी हक्काबाबत तसेच इतर हक्काबाबत भविष्यात काही विवाद उदभवल्यास व त्यामध्ये तथ्य आढळल्यास तसेच मालकी हक्काबाबत काही गंभिर स्वरुपाच्या कायदेशिर त्रृटी आढळल्यास,न्यायालयाचे काही निर्णय झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील .**

२३. स्थानिक प्राधिकरणास खुली जागा,रस्ते यासाठीचे क्षेत्र हस्तांतरीत झाले नसल्याचे आढळून आल्यास ही परवानगी तसेच पुर्वीच्या परवानग्या रदद होण्यास पात्र राहतील.

२४. **प्रस्तुत बिनशेती क्षेत्रात करणेत येणाऱ्या बांधकामासाठी प्लॅाय - अॅश व्दारे तयार करण्यात आलेल्या विटांचा वापर करणे बंधणकारक राहील.**

२५. **महाराष्ट्र जमिन महसुल (सुधारणा)अध्यादेश १९९४ ल म-६ नुसार परवानाधारक यांनी लेआऊट मधील प्लॉटची मोजणी व रेखांकन भुमि अभिलेख विभागाकडून करुन घेवून नगररचना विभागाकडुन अंतिम अभिन्यास मंजुर करणे बंधनकारक आहे.**

स्वाक्षरीत/-
*उपविभागीय अधिकारी*
*निफाड भाग निफाड*

प्रति,
श्रीमती सुमनबाई बाबुराव विधाते
श्री बाबुराव काशिराम विधाते
रा.पिंपळगाव (ब.) ता.निफाड जि.नाशिक

१. म. **तहसिलदार- निफाड** यांचेकडेस मुळ संचिका पा.क्रं.१ ते १४३ सह अभिलेखात जतन करणे व योग्य कार्यवाहीकामी रवाना. याशिवाय आणखी असे की, परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर केल्याबद्यल लक्ष ठेवावे. परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर विहीत नमून्यामध्ये तसेच अकृषिक प्रयोजन नोंदवहीमध्ये बिनशेती साऱ्याबाबत वसुलीच्या दृष्टीने योग्य ती नोंद घ्यावी. परवानदार यांचेकडून योग्य त्या नमुन्यात सनद करुन घ्यावी.
टीप-परवानदार यांनी मोजणी फी चलन क्र.४३५ दिनांक.२९/९/१७रोजी रक्कम रु.८०००/-भरली असून ती प्रकरणात सामील केली आहे.
२.म. उपअधिक्षक भूमि अभिलेख, निफाड यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
३.म.सहा.संचालक नगर रचना, नासिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.
४.सरपंच ग्रामपंचायत पिंपळगाव (ब.) ता.निफाड जि.नासिक.
५.तलाठी - पिंपळगाव (ब.) ता.निफाड जि.नासिक.

उपविभागीय अधिकारी निफाड भाग

*उपविभागीय अधिकारी*
*निफाड भाग निफाड*